# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७४ वा वर्धापन दिन शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ सर्व शिक्षक शिक्षकेतर अधिकारी व सेवकांचे विविध गुणदर्शनाचे व सांस्कृतिक कार्यक्रम शनिवार दिनांक ११ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयोजीत करण्यात येणार आहेत.

या परिपत्रकाव्दारे असेही कळविण्यात येते की, जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवक विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेऊ इच्छित आहेत. अशा शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत लेखी अर्ज शुक्रवार दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत श्री. संतोष मदने, प्रशासन शिक्षकेतर कक्ष व श्रीमती मेघना माटे, शैक्षणिक विभाग यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता वेळेची मर्यादा असल्याने प्रथम येणा—यास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच ऐनवेळी येणा—या सादरीकरणास सहभागी होता येणार नाही.

मंगळवार दिनांक ७ फेब्रुवारी,२०२३ रोजी दुपारी ३.०० ते ५ या वेळेत सदर कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणा—या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांचे ते सादर करणा—या विविध गुणदर्शन कार्यक्रमाची निवड चाचणी होणार आहे. तसेच दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० तालीम व रंगीत तालीम नियमीत आहे. याची नोंद घेण्यात यावी.

या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होणा—या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना सदर कार्यक्रमात सहभाग घेतल्याबाबतचे प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे, याची सर्वानी नोंद घ्यावी.

कुलसचिव

गणेशखिंड
जावक क्र. आर./२/३५
दिनांक : ३१/०१/२०२३
सोबत : निर्देश
प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

१. सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख } सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सेवकांच्या
२. सर्व संबंधित प्रशासकीय शाखाप्रमुख } निदर्शनास आणून द्यावे. ही विनंती.